**बहीण---------------!!!!!!!**

बहीण म्हणजे बहीणच असते,
रक्ताची, नात्याचीच असावी,
असे कधीच नसते.

मनाने मानावी, धाग्यात बंधावी,
धर्माची, जातीचीच असावी,
असे कधीच नसते.

वरदात खुलावी, डोळ्यात हसावी,
सुवर्णात, पैठणीतच, गुंतावी,
असे कधीच नसते.

टपालात यावी, डोळ्यात पाणवावी,
इथे, जवळच असावी,
असे कधीच नसते.

बहीण म्हणजे बहीणच असते,
ह्याची, त्याचीच असते,
असे कधीच नसते.

**डॉ. विनोद अडबे**